# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्याच्या विविध धरणांतील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात घट झाल्याबाबत

**(१) १६८५९ (०३-०८-२०१५). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध धरणांतील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात घट झाली असून मराठवाड्यातील परिस्थिती अधिकच चिंताजनक असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षापासून राज्यात पाणीटंचाई भेडसावत असून प्रामुख्याने मराठवाड्याचे पर्जन्यमान कमी असल्याने जलयुक्त शिवार योजनेसारखा कार्यक्रम हाती घेतला आहे परंतू याचा परिणाम जाणवायला दोन वर्षाचा कालावधी लागणार असल्याने शासनाने सध्याची पाणीटंचाई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१६) :**(१) होय.

१५ मे, २०१५ रोजीच्या पाणीसाठा अहवालाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील धरणांमध्ये संकल्पित पाणी साठयाच्या २२% उपयुक्त साठा, तर मराठवाडयातील मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यस्तरीय) प्रकल्पांतील जलाशयांमध्ये एकूण संकल्पीत पाणीसाठयाच्या ८% एवढा उपयक्त पाणीसाठा उपलब्ध होता.

(२) सर्वासाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून संपूर्ण राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये घेतला आहे. सदर अभियांनातर्गत पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडविणे, विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे, जुन्या बंद पडलेल्या योजनांचे पुनर्जिवीकरण, अस्तित्वातील जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, पाण्याच्या ताळेबंदाबाबत जाणीव जागृती निर्माण

करणे, भुर्गभातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, लोकसहभाग वाढविणे इ. या अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. हे उद्देश सफल करण्यासाठी पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरण व रुंदीकरण, जुन्या संरचनांचे पुनर्जिवन करणे पाझर तलाव/ ल.पा. तलाव दुरुस्ती, विहीर बोरवेल पुर्नभरण, कालवा दुरुस्ती, पाण्याचा कार्यक्षम वापर इ. कामे या अभियांनातर्गत हाती घेण्यात आली आहेत.

सध्याची पाणीटंचाई विचारात घेता पिण्यासाठी लागणारे पाणी प्रथम प्राधान्याने राखून ठेवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांबाबत**

**(२) १८९३५ (१७-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या वतीने आपल्या विविध मागण्यांसाठी दिनांक १९ मे, २०१५ रोजी मंत्रालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या काय आहेत,

(३) सदर मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत काय, असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) या मागण्यांवर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मुंबई उपनगरासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(३) २०६२९ (१७-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ (सर्वसाधारण) अंतर्गत रु.३०.०७ कोटी वाढीव निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.वित्त व नियोजन मंत्री तसेच मा. पालक मंत्री, मुंबई उपनगर जिल्हा यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्या निणर्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०७-२०१६)** :(१) होय. हे अंशत: खरे आहे.

मुंबई उपनगर जिल्हयाच्या जिल्हा वार्षिक योजना, २०१५-१६ (सर्वसाधारण) अंतर्गत रु.३०.०७ कोटी वाढीव निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा. वित्त व नियोजन मंत्री यांना पाठविलेले निवेदन मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे कार्यालयास प्राप्त झाले नाही.

तसेच जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ संदर्भात मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठक पार पडल्यानंतर मा. पालकमंत्री, मुंबई/ जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) ते (४) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. जिवायो-१००९/ प्र.क्र. २०१५/का.१४८१, दि. १७/४/२०१० अन्वये निश्चित केलेल्या निधी वाटप सूत्रानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करितां जिल्हयांना नियतव्यय मंजूर करण्यात येतो. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्हयास सन २०१५-१६ च्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करिता रु. २३९.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

मुंबई उपनगर जिल्हयास सन २०१४-१५ साठी रु. १७०.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर होता. त्या तुलनेत सन २०१५-१६ करिता रु. ६९.०० इतकी वाढ मुंबई उपनगर जिल्हयास देण्यात आली आहे.

---

## मा.राज्यपालांच्या निदेशानुसार टक्केवारीप्रमाणे प्रदेशनिहाय केलेल्या खर्चाचे संवितरण करण्याबाबत

**(४) २८३२३ (२०-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात राज्यात मा.राज्यपालांच्या निदेशात करारनिविष्ट केलेल्या टक्केवारीप्रमाणे प्रदेशनिहाय सिंचन क्षेत्रातील खर्चाचे संवितरण करण्यात आले आहे काय,
(२) तसेच प्रदेश निहाय विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, नाशिक विभाग यांच्या सिंचन क्षेत्रातील खर्चाचे संवितरण कसे करण्यात आले आहे,
(३) असल्यास, यातील प्रदेशनिहाय अखर्चित रक्कम किती आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०२-२०१६)** :(१) व (२) सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात राज्यात मा.राज्यपाल महोदयांना निदेशाप्रमाणे अर्थसंकल्पीत केलेली तरतुद व त्यानुषंगाने करण्यात आलेले वितरण खालीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| अर्थसंकल्पिय केलेली तरतूद | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **वर्ष** | **विभाग** | **सुत्रानुसार तरतूद** | **सुत्राबाहेर ठेवलेली तरतूद** | **एकूण तरतूद** |
| १ | २०१३-१४ | विदर्भ | १५३७.४३ | १२७७.०० | २८१४.४३ |
| | | मराठवाडा | १३१५.९२ | २०.०० | १३३५.९२ |
| | | उर्वरित महाराष्ट्र | ३०६४.५१ | ५४.५३ | ३११९.०४ |
| | | **एकूण** | **५९१७.८६** | **१३५१.५३** | **७२६९.३९** |
| २ | २०१४-१५ | विदर्भ | ११९७.०९ | १६५९.०० | २८५६.०९ |
| | | मराठवाडा | १२८५.७५ | ३३.०० | १३१८.७५ |
| | | उर्वरित महाराष्ट्र | २८४१.३५ | ३३.०० | २८७४.३५ |
| | | **एकूण** | **५३२४.१९** | **१७२५.००** | **७०४९.१९** |
| **वितरीत केलेली तरतूद** | | | | | |
| **अ.क्र.** | **वर्ष** | **विभाग** | **सुत्रानुसार तरतूद** | **सुत्राबाहेर ठेवलेली तरतूद** | **एकूण तरतूद** |
| १ | २०१३-१४ | विदर्भ | ११७७.६४ | १९७७.०० | ३१५४.६४ |
| | | मराठवाडा | १०५४.८९ | २०.०० | १०७४.८९ |
| | | उर्वरित महाराष्ट्र | २२३०.३६ | ५४.५३ | २२८४.८९ |
| | | **एकूण** | **४४६२.८९** | **२०५१.५३** | **६५१४.४२** |
| २ | २०१४-१५ | विदर्भ | १३६३.०० | १३१५.०५ | २६७८.०५ |
| | | मराठवाडा | ८६९.६६ | ३३.०० | ९०२.६६ |
| | | उर्वरित महाराष्ट्र | १९२४.७३ | ३३.०० | १९५७.७३ |
| | | **एकूण** | **४१५७.३९** | **१३८१.०५** | **५५३८.४४** |

उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात नाशिक, पुणे व कोकण हे महसूल विभाग समाविष्ट आहेत.

(३)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २०१३-१४ मधील प्राप्त निधीतील अखर्चित रक्कम | | २०१४-१५ मधील प्राप्त निधीतील अखर्चित रक्कम |
| | विदर्भ | | ९४७.५७ | | ११३९.०२ |
| | मराठवाडा | | ११२.३३ | | १७८.९२ |
| | उर्वरित महाराष्ट्र | | २७७.९४ | | ५१०.४२ |

**फलटण (जि.सातारा) तालुक्यात नीरा उजवा कालव्यातून पाणी चोरी होत असल्याबाबत**

**(५) ३०५१९ (२२-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फलटण (जि.सातारा) तालुक्यात दुष्काळाने उग्ररुप धारण केल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असताना येथील नीरा उजवा कालव्यातून पिंडाना पाणी देण्यासाठी दररोज लाखो लिटर पाण्याची सायपन पध्दतीने चोरी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील पाणीचोरी थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील पानशेत धरणाच्या प्रतिबंधित क्षेत्रात उभारलेल्या अनधिकृत हॉटेल आणि बोटींगमुळे धरण्याच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(६) ३१०९२ (२२-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील पानशेत धरणाच्या प्रतिबंधित क्षेत्रात उभारलेल्या अनधिकृत हॉटेल आणि बेकायदा बोटींगमुळे धरणाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन येथील अनधिकृत हॉटेल्स व बेकायदा बोटींगवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) व (२) बेकायदा हॉटेल व बोटींग व्यवसाय बंद करण्यात आला असुन धरणाच्या सुरक्षेला धोका निर्माण झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिन्नर तालुक्याच्या टोकापर्यंत पाणी कालव्याद्वारे पोहचविण्याबाबत**

**(७) ३१२६३ (२२-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर तालुकयातील कडवा कालव्यास आवर्तन सोडून तीन आठवड्यांचा कालावधी उलटल्यानंतरही सिन्नरच पूर्वभागात शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचत नसल्याने संतप्त शेतक-यांनी पाटबंधारे खात्याच्या तीन कर्मचा-यांना सुमारे साडेतीन तास मंदीरात डांबून ठेवल्याची घटना घडली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्याच्या टोकापर्यंत पाणी कालव्याद्वारे पोहचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.
(२) कडवा धरण प्रकल्पातील कडवा उजवा कालवा एकुण ८८ किमी लांबीचा असुन त्याद्वारे नाशिक, सिन्नर व निफाड तालुक्यातील लाभक्षेत्रातील गावांना पाणीपुरवठा केला जातो. कडवा कालव्याच्या नुतनीकरणाची कामे सुरू असुन ही कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उर्ध्व गोदावरी प्रकल्पामधील मांजरपाडा (जि.नाशिक) वळण योजनेचे काम सुरु करण्याबाबत**

**(८) ३४३७१ (२०-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उर्ध्व गोदावरी प्रकल्पामधील मांजरपाडा (जि.नाशिक) वळण योजनेचे काम तातडीने सुरु करून पाणी उपलब्ध करून दिले जाईल असे मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास विधानसभेत आश्वासन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मांजरपाडा (जि.नाशिक) वळण योजनेसाठी सन २०१४ - १५ मध्ये मंजूर असलेला रुपये ७० कोटी निधी या योजनेकरिता आवश्यक असल्यामुळे सदर निधी अन्य योजनांसाठी खर्च करू नये याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास निवेदन दिलेले असूनही सदर प्रकल्पाचा रुपये ४३ कोटी निधी कार्यकारी संचालकांनी अन्यत्र वळती केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेतील बोगद्याचे काम जरी पूर्ण झाले तरी गुजरातकडे जाणारे पाणी महाराष्ट्राकडे वळेल त्यामुळे या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत किंवा या योजनेसाठी मंजूर निधी खर्च करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून या प्रकल्पाचा निधी पुनःश्च मांजरपाडासाठी पुनर्वितरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) सन २०१५ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मांजरपाडा २ च्या योजनेसंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ करीता मंजूर अनुदान रु.७० कोटी होते त्यापैकी २६.८० कोटी निधी प्राप्त झाला. प्राप्त निधी अन्यत्र वळती केला नाही तथापि, सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करण्यास शासन मान्यता नसल्याने योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही. रु.२६.३८ कोटी इतका निधी शिल्लक आहे.

(३) होय.

(४) मांजरपाडा वळण योजना ही उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा भाग आहे. सिंचन विषयक विशेष चौकशी अहवालावरील कार्यपालन अहवालात सदर प्रकल्पाची तपासणी व फेर रचना राज्यतांत्रिक सल्लागार समितीमार्फत करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार राज्यतांत्रिक सल्लागार समिती अभिप्राय मागविण्यात आले. त्यानुसार उक्त प्रकरणी निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुधगंगा धरण हत्ती महाल व तुळशी धरण (ता.राधानगरी) येथील पाटबंधारे विभागाचे विश्रामगृह बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(९) ३४४३८ (१४-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधगंगा धरण हत्ती महाल व तुळशी धरण (ता.राधानगरी) येथील पाटबंधारे विभागाचे विश्रामगृह गेली कित्येक वर्षे बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राधानगरी तालुका पर्यटन दृष्ट्या विकसित होत असताना बंद विश्रामगृहामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची विश्रामगृहे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

राधानगरी तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या कार्यकक्षेतील विश्रामगृहे/निरीक्षण बंगले पर्यटकांसाठी नसून शासकीय कामांच्या उपयुक्ततेच्या दृष्टिने कार्यरत आहेत.

(३) राधानगरी तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या कार्यकक्षेतील विश्रामगृहे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(४) विश्रामगृहे धरणस्थळावरील असल्याने त्यांची प्रकल्प व्यवस्थापनासाठी जलसंपदा विभागास आवश्यकता आहे.

---

**मिरा भाईंदर शहरात पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(१०) ३४८४५ (१४-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर शहरात पाणीपुरवठा करण्यासंदर्भात तेथील लोकप्रतिनिधींनी दि.२९ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार मिरा-भाईंदर शहरात पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०७-२०१६) :**(१) अशंत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारचे निवेदन १० नोव्हेंबर, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र यांना दिलेले आहे.

(२) याबाबत मा. मंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली दि. १/१२/२०१५ रोजी बैठक झाली आहे. सदर बैठकीत स्टेम प्राधीरणामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिकेस होणाऱ्या पाणी पुरवठयात कपात शिथील करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेला किमान मापदंडानुसार पाणीपुरवठा करण्याबाबत निर्देश मा. मंत्री महोदय यांनी दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा मतदार संघातील लाख बंधाऱ्याचे नष्ट झालेले कालवे दुरुस्ती करण्याबाबत**

**(११) ३४८९१ (१२-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा मतदार संघातील लाख बंधाऱ्याचे नष्ट झालेले कालवे दुरुस्ती करण्यासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे ८० च्या दशकापर्यंत २३ गावांचे क्षेत्र ओलिताखाली आले असून, मात्र गेल्या ३० वर्षात कालवे नष्ट झाले ते कालवे पुन्हा वाहते करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, सदरहू निधीमधून कोणकोणती कामे केली आहेत वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) लाख बंधारा हा सुमारे १५० वर्ष जुना बंधारा असुन या बंधाऱ्यावरुन सन १९९५-१९९६ पासून सिंचन करण्यात येत नसल्याने यासाठी निधीची तरतूद केली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) विशेष दुरूस्तीचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आलेल्या आहेत.

---

**गोंदिया जिल्ह्यामध्ये बी.पी.एल. यादीचे सर्वेक्षण तातडीने करण्याबाबत**

**(१२) ३५३९८ (२२-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यामध्ये गेल्या १५ वर्षापासून बी.पी.एल. यादीचे सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे अनेक कुटूंबे सदर योजनेपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १५ वर्षापासून करण्यात न आलेले बी.पी.एल. यादीचे सर्वेक्षण तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६) :**(१) व (२) नाही.
केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्याकरीता राज्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणना २००२ करण्यात आली असून पात्र कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.
(३) दरम्यान केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचनेनुसार राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्याकरीता राज्यात सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करण्यात येत असून सदरील सर्वेक्षण आता अंतिम टप्प्यात आलेले आहे.

---

**चोपडा पाटबंधारे उपविभाअंतर्गत कुरवेळ वितरिका व वेळे वितरिका या दोन्ही वितरिकांना शेवटपर्यंत पाणी पोहोचत नसल्याबाबत**

**(१३) ३५४३९ (२०-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा पाटबंधारे उपविभागा अंतर्गत कुरवेळ वितरीका २२ कि.मी. व वेळे वितरिका ०८ किमी हया वितरिकांचे काम सन १९८२ ला सुरु होऊन सन १९९१ ला पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी कुरवेळ वितरिकेला फक्त ११ किमी व वेळे वितरिकेला फक्त ४ किमी पर्यंतच पाणी पोहोचते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वितरिकांना स्थापनेपासूनच अद्यापपावेतोपाणी पोहोचू न शकल्याने शेतक-यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हया दोन्ही वितरिकांना शेवटपर्यंत पाणी पोहोचण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

कुरवेल वितरीकेची एकूण लांबी २१ किमी असुन बांधकाम पुर्ण झाले त्यावेळी सिंचन व्यवस्थापनाकडे हस्तांतरीत करताना शेवटपर्यंत पाणी पोहाचले होते. सदर वितरीकेवरील एकूण ३५९३ हेक्टर सिंचन क्षेत्राच्या तुलनेत गेल्या १० वर्षात २,९८४ हेक्टर इतके कमाल सिंचन झालेले आहे.

वेले-१ वितरीकेची एकुण लांबी ७.२९ किमी असुन या वितरीकेच्या पृच्छ भागापर्यंत पाणी पोहोचत आहे. सदर वितरिकेवरील एकूण ८०६ हेक्टर सिंचन क्षेत्राच्या तुलनेत गेल्या २० वर्षात ६५६ हेक्टर इतके कमाल सिंचन झालेले आहे.

वेले-२ वितरीकेची एकूण लांबी ७.८० किमी असून या वितरीकेच्या ५ किमी पर्यंतची पाणी मागणी क्षेत्रिय स्तरावर नियमितपणे प्राप्त होत असल्यामुळे ५ किमी पर्यंत पाणी पोहोचले आहे. किमी ५ च्या पुढे सिंचनासाठी प्राप्त होणाऱ्या मागणी करिता आवश्यक किरकोळ दुरूस्त्या करुन लाभधारकांना पाणी देण्यात येत आहे.

सबब कुरवेल, वेले-१ व वेले-२ या तिन्ही वितरिकांवर शेवटपर्यंत पाणी पोहोचले आहे.

(४) कुरवेल, वेले-१ वेले-२ या वितरीकांच्या भागातील सर्व वितरण व्यवस्था काळ्या मातीतील असलेने त्यास वेळोवेळी दुरूस्ती देखभाल करणे आवश्यक असते. तथापि निधी उपलब्धतेच्या मर्यादमुळे सिंचन हंगामापूर्वी आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करण्यास अडचण होत असल्यामुळे सर्व लाभधारकांना वेळेत मिळणे अशक्य होते. त्यामुळे काही लाभधारक काही अंशी असमाधानी असतात.

या वितरिकांची दुरूस्तीची कामे महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प या योजनेअंतर्गत हाती घेण्यात आली होती. तथापि या योजनेची मुदत संपल्यामुळे उर्वरित दुरूस्ती कामे विशेष दुरुस्ती विस्तार व सुधारणा या योजनेतून करण्याचे नियोजित असुन त्यानुषंगाने अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

### शिर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील जायकवाडी धरणात पाणी सोडण्याच्या निर्णयाबाबत

**(१४) ३५६६३ (१४-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील जायकवाडी धरणात पाणी सोडण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे शेती व्यवसाय बंद होण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे गोदावरी, प्रवरा व मुळा कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, नेवासे व राहूरी तालुक्यातील शेतकरी रस्त्यावर उतरुन ठिकठिकाणी बाजारपेठा बंद करुन आंदोलने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांना शेतीसाठी जादा पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.
दिनांक १९/१०/२०१५ रोजी गोदावरी कालवे पाटपाणी संघर्ष समिती, कोपरगांव यांनी मा.आ.सौ.स्नेहलता कोल्हे यांचे नेतृत्वाखाली महामंडळाचा दिनांक १७/१०/२०१५ चा जायकवाडी धरणासाठी दारणा समुहातुन ३.२४ टिएमसी पाणी सोडण्याचा निर्णय तातडीने रद्द करण्यासाठी मोर्चा काढला होता.
(२) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निर्गमित केलेले दिनांक १७/१०/२०१५ रोजीचे आदेश हे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दिनांक १९/०९/२०१४ रोजीच्या निवाड्यानुसार आहेत. कार्यकारी संचालकांच्या वरील आदेशाविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने जायकवाडीत सोडलेले पाणी फक्त पिण्यासाठीच वापरण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत.

त्याचप्रमाणे राज्याच्या विविध भागात पाण्याची टंचाई जाणवत असल्यामुळे महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक ०७/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील विविध धरणातील पाणीसाठा पुरेसा पाऊस पडेपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी राखुन ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत.

तथापि महामंडळाच्या दिनांक १७.१०.२०१५ रोजीच्या आदेशातील कलम ६ अन्वये नदीपात्रात सोडावयाचा पाणीसाठा वगळता उर्वरीत पाणीसाठ्यातून जानेवारी २०१६ मध्ये नाशिक डावा तट कालव्यास पिण्यासाठी व सिंचनासाठी एक आवर्तन देण्यात आलेले आहे. तसेच दिनांक ०४/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार गोदावरी कालव्याच्या मर्यादित क्षेत्रास दिनांक ११/०१/२०१६ ते दिनांक ०२/०२/२०१६ या कालावधीत दारणा धरण समुहातील दारणा धरणातुन १३९३.७८ दलघफु, मुकणे धरणातुन २५२.८१ दलघफु, कडवा धरणातुन ८६.४३ दलघफु व वालदेंवी धरणातुन ५५७.४८ दलघफु असे एकुण २२९०.५० दलघफु पाणी पुरविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्यासाठी काळवटी साठवण तलावाची उंची दोन मीटरने वाढविण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ३६८५४ (१५-०१-२०१६). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्यासाठी काळवटी साठवण तलावाची उंची दोन मीटरने वाढविण्याचा प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे आज एकूण १०४ गावांपैकी ९० गावांवर पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ११ गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु असून ७९ विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत तसेच पुरेसा पाऊस नसल्याने पीके भुईसपाट झाले असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गेल्या तीन महिन्यांपासून पाणी व चाऱ्याअभावी जनावरांची मोठी होरपळ सुरु आहे त्याचप्रमाणे मजुरांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजूरी मिळाली तर अंबाजोगाईकरांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय, अंशत: खरे आहे. सततच्या अल्प पर्जन्यामुळे भुजलाची पातळी खालावल्यामुळे अंबाजोगाई तालुक्यातील बहुतांश गावात टंचाई परिस्थिती उद्भवली आहे.
(३) होय, हे खरे आहे. सध्या १२ गावांना टॅकरद्वारे पाणीपुरवठा सुरु असुन ५८ गावांमध्ये विहिर/बोअर अधिग्रहण केले आहे. पुरेसा पाऊस नसल्यामुळे पिकांची वाढ आवश्यकतेप्रमाणे झालेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) काळवटी साठवण तलाव ता.अंबाजोगाई योजनेची दोन मीटर उंची वाढवून अतिरिक्त ०.५० दलघमी पाणीसाठा निर्माण करण्यासाठी आवश्यक सेवा उपलब्ध होत नसल्याने पाणी उपलब्ध प्रमाणपत्र देता येत नाही. तथापि प्रस्तुत प्रकल्पामुळे अंबाजोगाई शहराचा पाणी प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता असल्याने शासन स्तरावर सदर प्रस्तावाची फेर तपासणी करण्यात येत आहे.

---

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे फेर सर्व्हे करण्याबाबत

**(१६) ३७१३१ (२१-१२-२०१५). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची एकूण संख्या किती आहे व त्याचा सर्व्हे केव्हा झाला आहे,
(२) असल्यास, सदर तालुक्यात अत्यंत हलाकीचे जीवन जगणा-या कुटुंबांची संख्या मोठया प्रमाणात असून सदर कुटुंब दारिद्रयरेषेसाठीच्या किमान उत्पन्नात मोडत असूनही त्यांचा समावेश दारिद्रयरेषेच्या यादीमध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दारिद्रयरेषेखालील कुटुंबांचे फेर सर्व्हे करुन पात्र कुटुंबांचा दारिद्रयरेषेच्या यादीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६)** :(१) नेवासा जिल्हा अहमदनगर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे सन २००२ रोजी झालेला असून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची एकूण संख्या १५६८८ आहे.
(२), (३) व (४) या यादीमध्ये ज्या कुटुंबांचा समावेश झालेला नाही त्यांचेकरीता व्दिस्तरीय अपिलाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार नेवासा तालुकास्तरावर १६५२४ अपिले प्राप्त झाली असून सुनावणीनंतर ९९११ अपिले पात्र ठरलेली आहेत. त्यापैकी १०५७ कुटुंबांचा दारिद्र्य रेषेखालील यादीत समावेश करण्यात आलेला आहे. तसेच आता दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करण्यात येत असून सदरील सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे.

---

**कोकडी तांडा (ता.पाचोरा, जि.जळगाव) या परिसरात असलेल्या म्हसाळा धरणातील पाण्याच्या चोरीमुळे निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(१७) ३७७८७ (२०-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकडी तांडा (ता.पाचोरा, जि.जळगाव) या परिसरात असलेल्या म्हसाळा धरणातील पाण्याची चोरी होत असल्याचे प्रकार माहे आक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या परिसरात पाणी टंचाई व गुरांच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची पाणी चोरी पाटबंधारे आणि वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांशी व्यवहार करून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्नुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंठफेळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील साठवण तलावाचे काम त्वरीत काम सुरु करण्याबाबत**

**(१८) ३८८९७ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंठेफळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील साठवण तलावाचे काम सद्यस्थितीत बंद असल्याची बाब माहे जूलै, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तलावांचे अपूर्णावस्थेतील काम तातडीने सुरु करण्याबाबत, तसेच बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) खरे आहे.

दिनांक ३१/१२/२०१३ पासून पर्यावरण मान्यतेसाठी खुंटेफळ साठवण तलाव ता. आष्टी जि. बीड चे काम बंद आहे.

(२) प्रकल्पास केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, दिल्ली यांचेकडून पर्यावरण मान्यता मिळणेस्तव Terms of Reference (TOR) प्रस्ताव सादर करण्यात आला. दिनांक १०/१२/२०१५ रोजी TOR प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली असून, पर्यावरण मान्यतेसाठी पुढील आवश्यक अभ्यास (Environmental Impact Assessment (EIA) व Environment Monitoring and Assessment (EMP) प्रगतीपथावर आहे. खुंटेफळ साठवण तलावासाठी प्रथम टप्प्यात (१.६८ अ.घ.फु पाणी वापर) एकूण आवश्यक ७१७ हे. क्षेत्रापैकी १९३.५७ हे. क्षेत्र सरळ खरेदीद्वारे संपादीत करण्यात आले असून या क्षेत्राचा संपूर्ण मावेजा रु. २०.०१ कोटी वाटप करण्यात आला आहे. उर्वरीत क्षेत्राचे संपादन पर्यावरण मान्यतेनंतर निधी उपलब्धतेनुसार व भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये करण्याचे नियोजन आहे. तसेच पर्यावरण मान्यतेनंतर निधी उपलब्धतेनुसार उर्वरित काम हाती घेणेत येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उर्ध्व गोदावरी प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(१९) ४०८२० (०४-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन विषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालानुसार उर्ध्व गोदावरी प्रकल्पातील मांजरपाडासह १७ वळण योजना तसेच पुणेगाव - दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालवा इ. बाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने तपासणी करण्याचे दिनांक २६ जून, २०१४ रोजीच्या पत्रान्वये शासनाने आदेश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी शासनास अहवाल पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने उर्ध्व गोदावरी प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस प्रथमदर्शनी अंदाजपत्रकात व निविदेत काही अनियमितात निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे याची सखोल छाननी (Technical Audit) करण्यासाठी व्दिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. टेक्नीकल ऑडीट व राज्य तांत्रिक सल्लागार समितीचे अहवालानुसार प्रकल्प अहवालात आवश्यक सुधारणा करुन सुधारित प्रकल्प अहवालास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### श्री क्षेत्र जेजुरी गडाच्या विकासासाठी निधी मिळण्याबाबत

**(२०) ४११८४ (०४-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र जेजुरी गडाच्या विकासासाठी रुपये १८० कोटी ७८ लाख रुपयांचा निधी माहे सप्टेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान उपलब्ध करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार शासनाने नव्याने रुपये १२६ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील निधी जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, सदर निधीतून कोणत्या स्वरुपाची कामे केली जाणार आहेत याचा आराखडा तयार करण्यात येऊन कामास प्रत्यक्षात सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :**(१) ते (३) श्रीक्षेत्र जेजूरी गडाच्या विकासासाठी दिनांक १० सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.१८०.७८ लाख इतक्या रक्कमेस शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार उक्त कामास रु.१२६.५४ लाख निधी मंजुर केला आहे. त्यानुसार रु.१२६.५४ लाख इतका निधी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

(४) सदर निधीतून मुख्य मंदिर, सभामंडप, तटबंदी, छज्जा व अनुषंगिक इमारतीचे वॉटरप्रुफींग करणे याकरिता रु.४५.७६ लाख व पालखी मार्ग उत्तर बाजूस दगडी पेव्हींग करणे याकरिता रु.१३५.०२ लाख रक्कमेची कामे केली जाणार आहेत. त्यापैकी दगडी पेव्हींग बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर काम माहे डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. वॉटर प्रुफींग च्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर माहे डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर ( जि.बुलढाणा) मतदार संघातील विविध विभागातील**
**विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ४१६६४ (०५-०५-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर मतदार संघातील (जि.बुलढाणा) विविध विभागातील विकास कामे अर्धवट अवस्थेत असणे, अनेक विभागात पदे रिक्त असून त्याचा विकास कामावर परिणाम होत असल्याने सिचंनाची कामे प्रलंबित असून ही विकास कामे तातडीने सुरु करण्याकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्र्यांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) नाही.
तथापि डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) यांचे मा.मुख्यमंत्री महोदय यांना पाठविलेल्या दिनांक १४.१२.२०१५ च्या पत्रामध्ये पेनटाकळी प्रकल्प कालवे उपविभाग, मेहकर, जि.बुलढाणा येथील रिक्त पदे तातडीने भरणेबाबतची विनंती केली आहे.
उप विभागीय अभियंत्याचे पद बदलीने दिनांक ३१.५.२०१६ च्या शासन आदेशान्वये भरण्यात आले आहे.
(२) पेनटाकळी प्रकल्प पुर्ण झाला असून नियोजनातून वगळलेला आहे. शिल्लक निधी रु.३.३८ कोटी मधून उर्वरित कामे करण्यात येत आहे. चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.
मेहकर तालुक्यातील बोरखेडी मिश्र संग्राहक न्यायालयाचे निर्णयामुळे जमीन ताब्यात नसल्यामुळे कामे स्थगित आहे. हरडव व दुर्गबोरी प्रकल्पांची कामे सुरू आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्यातील खारभूमी योजनांसाठी मंजुरी देणे व निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२२) ४१९६९ (०६-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्यातील खाडी व समुद्र लगतच्या क्षेत्रातील भातापिका खालील जमिनीमध्ये समुद्राचे खारेपाणी शिरून खारभूमी योजनांची कामे अपूर्ण असल्यामुळे बाधीत क्षेत्रात वाढ झाली असल्याने संबधित विभागाकडे नवीन योजना तसेच अपूर्ण योजनांसाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने माहे जानेवारी, २०१६ पर्यंत कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, कार्यवाही केव्हा पर्यंत पूर्ण होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०७-२०१६) :**(१) व (२) होय.

रायगड जिल्ह्यात २ नविन योजनांची बांधकामे, ९ योजनांचे नुतनीकरण व ९ योजनांची पुर्ननुतनीकरण अशी एकूण २० कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच २ योजनांच्या नुतनीकरणाच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या सर्व कामांसाठी सन २०१६-२०१७ करीता रु.११३१.०२ लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२३) ४२९७७ (२१-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एकरकमी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी येत्या चार महिन्यात निर्णय घेतला जाणार असून यासाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याची माहिती मा.जलसंपदा मंत्री यांनी दिनांक १८ ऑक्टोबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास म्हैसाळ योजनेच्या डोंगरवाडी प्रकल्पाचे उद्‌घाटनानंतर भोसे येथे झालेल्या शेतकरी मेळाव्यात दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती प्रकल्प प्रलंबित असून सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(३) तसेच पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: सातारा जिल्हयात अनेक तालुके दुष्काळग्रस्त असून त्यात अनेक प्रकल्प निधीअभावी बंद असल्यामुळे शासनाने सातारा जिल्हयातील जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०६-२०१६) :**(१) राज्यातील बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलबध करुन देण्यासाठी, वेगवेगळ्या वित्तीय संस्थाकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याचे मा.मंत्री, जलसंपदा यांनी म्हैसाळा योजनेच्या उद्‌घाटन प्रसंगी सांगितले.

(२) राज्यात ३७६ प्रकल्प बांधकामाधीन आहे. या प्रकल्पांची उर्वरीत किंमत (नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपदानाच्या वाढीव किंमतीसह) सुमारे रु.८४,४३० कोटी इतकी आहे. पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असल्याने प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे. याबाबतचा आढावा घेऊन प्राथम्य क्रमानुसार आर्थिक गुंतवणूक करण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार अमरावती प्रदेशातील अनुशेष निर्मुलन कार्यक्रमातील सर्व प्रकल्प पुढील ३ वर्षात सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकेल अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे.

(३) अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश या नुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रकल्पाची कामे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हरणबारी प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देण्याबाबत**

**(२४) ४३७३७ (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) येथील हरणबारी डावा कालवा ८ ते ३३ कि.मी. या प्रकल्पाचे काम संदर्भ क्र. १ अन्वये सन १९९८ साली मंजूर झालेली असून प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देण्याची मागणी मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे बागलाण येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस १७ वर्षे होऊनसुध्दा कालव्याचे काम फक्त ३ कि.मी. पर्यंतच झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

हरणाबरी डावा वाढीव कालवा अंतर्गत १ ते ७ कि.मी.च्या नुतनीकरणाचे ९०% काम पूर्ण झाले आहे. तसेच कि.मी.८ ते १० मधील काम पूर्ण झाले आहे. कि.मी.११ ते १२ मधील शेतमालकांच्या विरोधामुळे काम बंद आहे.

(३) प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा जास्त खर्च झाला असल्याने प्रकल्पाचा सुधारित अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस छाननीस्तव सादर केला असून त्यांनी उपस्थित मुद्दांची पुर्तता प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कराड-उत्तर मतदार संघातील अवर्षण-प्रवण दुष्काळग्रस्त भागास लाभदायी ठरणाऱ्या धनगरवाडी व हणबरवाडी उपसासिंचन योजनांना निधी मिळण्याबाबत**

**(२५) ४३८२६ (३०-०४-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड-उत्तर मतदार संघातील अवर्षण - प्रवण दुष्काळग्रस्त भागास लाभदायी ठरणाऱ्या धनगरवाडी व हणबरवाडी जलसिंचन योजनांना सन २०१६-१७ मध्ये निधीची भरीव तरतूद करण्याची मागणी मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे कराड, जि.सातारा येथील लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.
(२) राज्य शासनाने अपूर्ण पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असल्याने ज्या प्रकल्पापासून पुढील ३ वर्षात प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळू शकेल अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार धनगरवाडी व हणबरवाडी या उपसा सिंचन योजनांकरिता सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात अनुक्रमे रु.०.०१ कोटी व रु.३.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुंडलवाडी शेळगाव चन्नापूर व पाटील माहटी (ता.बिलोली) या उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करुन त्याद्‌वारे कुडनवाडी परिसरात पाच मालमुजारी तलावामध्ये साठवण करण्याबाबत**

**(२६) ४३९५७ (३०-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील बाभळी बंधाऱ्याच्या बॅकवॉटरवर कुंडलवाडी शेळगाव चन्नापूर व पाटील माहटी (ता.बिलोली) या उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करुन

त्याद्वारे कुंडलवाडी परिसरात पाच मालगुजारी तलावामध्ये साठवण करण्याबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, पाटबंधारे नांदेड यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजी शासनाकडे पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

सदर प्रश्नातील दुसरी योजना पाटील माहटी नसून ती पाटोदा-माहटी अशी आहे.

(२) सदर योजना जलसंपदा खात्याच्या मालकीच्या नाहीत. तसेच ही योजना कुंडलवाडी विविध सहकारी संस्था व शंकर सहकारी कारखाना यांनी संयुक्तपणे अंशतः पुर्ण केलेल्या असल्याने, योजनांची उर्वरित कामे सुध्दा त्यांचे मार्फतच पुर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येसगी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील मांजरा नदीवर महाराष्ट्र व तेलगंणा दोन राज्याच्या संयुक्त चेकडॅम उभारण्याबाबत**

**(२७) ४३९६३ (२१-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येसगी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील मांजरा नदीवर वरच्या ठिकाणी महाराष्ट्र व तेलंगणा राज्याने संयुक्त चेकडॅम उभारण्यासंबंधीचा प्रस्ताव मा. जलसंपदा मंत्री, तेलंगणा राज्य यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. तेलंगणा राज्याचे पाटबंधारे मंत्री यांनी त्यांचे पत्र दिनांक २१.७.२०१४ अन्वये मांजरा नदीवर हुमनापूर शिवार, कोटगीरी (एम) निजामाबाद जिल्ह्यात चेकडॅम प्रस्तावित करण्याबाबत, तसेच सदरील प्रकल्प आंतरराज्य असल्याने चेकडॅम बांधण्यासाठी परवानगी देण्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(२) सदरील चेकडॅम संबंधी योजना दृष्टीपथात नाही व योजनेचे सर्व्हेक्षण आराखडे अद्याप तयार नाहीत. सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासनाच्या बृहत आराखड्यात या योजनेसाठी पाणी उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालूरा (जि.निजामाबाद) येथे उपसा जलसिंचन योजनावर केंद्रीय जल आयोगाने आक्षेप घेतल्याबाबत**

**(२८) ४३९६८ (३०-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येसगी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील महाराष्ट्र राज्याच्या हद्दीमध्ये घुसखोरी करुन आंध्र शासनाने (तेलंगणा) मांजरा नदीच्या पात्रामध्ये मोठे जॅकवेल (भूमिगत विहिरी) खोदून त्याद्वारे सालूरा, जि.निजामाबाद उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित केल्यामुळे शासनाने केंद्रीय जल आयोगाकडे आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नोंदविलेल्या आक्षेपाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व या आक्षेपावर केंद्रीय जल आयोगाने शासनास खुलासा केला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही कोणताच खुलासा दिला नसल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता पाठपुरवा केला आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

जलसंपदा विभाग, मंत्रालय यांचे दि.१७/०७/२००६ च्या पत्रान्वये मा.अध्यक्ष, केंद्रीय जलआयोग, नवी दिल्ली यांना सदरील योजनेचे काम थांबविण्याच्या सूचना आंध्रप्रदेश शासनास देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

(२) त्या अनुषंगाने केंद्रीय जलआयोगाने आंध्र प्रदेश सरकारकडून दि.०६/०९/२००६ च्या पत्रान्वये अभिप्राय मागविले होते. उपरोक्त पत्रव्यवहाराबाबत आंध्र प्रदेश सरकारने काही प्रतिसाद दिला नसून बांधकाम बंद न करता सालूरा उपसा जलसिंचन योजनेचे काम जवळपास पूर्णत्वास नेले असल्याने या प्रकरणामध्ये लक्ष घालण्याबाबत तसेच या योजनेचे बांधकाम थांबविण्याबाबत योजनेतून पाण्याच्या उपसा न करणेबाबत दि.०९/०७/२००७ च्या पत्रान्वये मा.मंत्री जलसंपदा यांनी मा. केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांना विनंती केली आहे. मा.प्रा.सैफोद्दीन सोज, तत्कालीन केद्रीय जलसंसाधन मंत्री यांनी त्यांच्या दि.२१/०४/२००८ च्या पत्रान्वये सदर बाब दोन राज्यांच्या हद्दीशी (Territorial Dispute) संबंधित असल्याने ही बाब जलसंसाधन मंत्रालयाच्या कक्षेत येत नाही असे मत दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे आणि अहमदनगर जिल्हयाच्या सीमेवर असलेल्या घाटघर येथे जलविदयुत उभारण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय**

**(२९) ४४३३८ (२०-०४-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि अहमदनगर जिल्हयाच्या सीमेवर असलेल्या घाटघर येथे टप्पा १ अंतर्गत १२५ मेगावॅट वीज निर्मितीचा जलविद्युत प्रकल्प व भंडारदरा येथे ११० मेगावॅटच्या मुथखेल जलविद्युत प्रकल्प उभारण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलविद्युत प्रकल्पाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या मंजूरी बाबत कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे व सदर प्रकल्प हा किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे व त्यामुळे वीज निर्मिती क्षमता किती मेगावॅट होणार आहे,
(३) असल्यास, याबाबतचा निर्णय किती दिवसात घेणार आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) घाटघर स्तर-२ (१२५ मेगावॅट) उंदचन जलविद्युत प्रकल्प व मुतखेल (११० मेगावॅट) उंदचन जलविद्युत प्रकल्प हे प्रकल्प प्रस्तावित असून क्षेत्रीय स्तरावर पूर्व प्राथमिक अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

प्राथमिक अन्वेषण अहवालास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन विस्तृत सर्वेक्षण व अन्वेषण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर सदर दोन्ही प्रकल्प निधी उपलब्धतेनुसार विकसित करण्यात येतील.

---

**जळकोट (जि.लातूर) येथील तिरु प्रकल्पाला नवीन बॅरेजेस व पाणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(३०) ४४७४० (२१-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळकोट (जि.लातूर) येथील तिरु नदीवर १० बॅरेजेस व पाणी प्रमाणपत्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिरु प्रकल्पावर नवीन बॅरेजेस व पाणी प्रमाणपत्र देवून कोल्हापुरी बंधारे विकसीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.
(२) तिरु नदीवर बांधण्यात आलेल्या १० कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची सिंचन क्षमता प्रत्येकी १०० हेक्टर पेक्षा कमी असल्यामुळे व तिरु नदी ही लहान असल्यामुळे त्यांचे बॅरेजस मध्ये रुपांतरण करणे आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य होत नाही तिरु नदीवरील बॅरेजेसला अद्याप मंजूरी मिळाली नाही. गोदावरी नदी खोऱ्याचा अभ्यास होऊन १८.३३ अघफु पाणी वापरास काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. तिरु नदीवरील प्रस्तावित चार बॅरेजेसचा समावेश १८.३३ अघफु मध्ये करण्यात आले असून अटींची पुर्तता क्षेत्रीय स्तरावर प्रगतिपथावर आहे. अटींची पूर्तता झालेनंतर पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करुन बंधारे बाबत निर्णय घेता येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडी शेवाडी (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील दिवी गावाच्या पूनर्वसनाबाबत**

**(३१) ४५१३३ (२१-०४-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडी शेवाडी (ता.शिंदखेडा, जि.धुळे) मध्यम प्रकल्पाचे मुख्य धरणाचे काम १०० टक्के पुर्ण झाले असुन पूनर्वसनाचे काम केवळ ५० टक्के झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील दिवी गावाचे पूनवर्सन करण्याचा निर्णय शासनाने ८ वर्षापूर्वी घेतला असतांना अद्यापही गावाचे पूनवर्सन झाले नसल्यामुळे दिवी गावात शासनाच्या कोणत्याही निधीचे काम करता येत नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच पूनर्वसनाअभावी प्रकल्पात पुर्ण क्षमतेने पाणी साठविता येत नाही त्यामुळे प्रकल्पाच्या पाण्याचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाचे आधी पूनवर्सन मग धरण असे धोरण असतांना दिवी गावाचे पूनवर्सन करण्यात आली नसल्याने त्याची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) पुनर्वसनाची नागरी सुविधांची कामे प्रगतीत असून अंतिम टप्प्यात आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर तालुक्यातील मौजे वाढीव गाव येथे समुद्राचे खारे पाणी शेतात जाऊन शेत जमिन नापीक होत असल्याबाबत**

**(३२) ४५२२१ (०३-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यातील मौजे वाढीव गाव येथे भरती आहोटीमुळे बांध तुटून भरतीचे खारे पाणी शेतात जाऊन शेत जमीन नापीक होत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असल्यामुळे त्या ठिकाणी खारभूमी योजना राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाअंतर्गत मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधिनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.

(२) सदर निवेदनातील मागण्यांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१. पालघर तालुक्यातील मौजे वाढीव येथे दरवर्षी भरती आहोटीमुळे बांध तुटून भरतीचे पाणी आत शेतात जावून सर्व शेतजमीन नापीक होत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. तसेच पिण्याचे पाणी देखील दिवसेंदिवस खारे होत आहे. खारभूमी विकास योजनेतून या ठिकाणी तात्पुरती डागडुजी बांधबंदीस्तीची कामे होत असतात. याबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

२. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प योजने अंतर्गत वाढीव गावात नवीन बंधारा बांधून देण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यात यावेत.

(३) मौजे वाढीव, ता. वसई, जि.पालघर ही योजना राष्ट्रीय चक्रीवादळ आपत्ती निवारण प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्यात आलेली असून योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे यांचेमार्फत महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडे जानेवारी, २०१५ मध्ये सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदीवरील राजापूर बंधाऱ्यांची गळती रोखण्याबाबत**

**(३३) ४५२९४ (२१-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदीवरील राजापूर बंधाऱ्यातून लाखो लिटर पाणी गळतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात कर्नाटकाच्या दिशेने सोडले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शिरोळ तालुक्यातील कृष्णाकाठावर पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे सदरच्या बंधाऱ्यांची गळती रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच गळतीच्या नावाखाली पाणी कर्नाटकाच्या दिशेने सोडणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) जानेवारी, २०१६ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात उपाययोजना करुन बंधाऱ्यातून होणारी गळती थांबविणेत आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुंडगे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३४) ४५४१३ (२९-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुंडगे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्यावरुन पाटबंधारे विभागाची अवजड वाहने जावून बंधाऱ्याचे पिलर कोसळून बंधारा धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) सदर बंधाऱ्याची क्षेत्रिय स्तरावर पाहणी करण्यात आली आहे. सदर बंधारा १५ वर्षापूर्वी बांधण्यात आला असून तीव्र पर्जन्य क्षेत्रामध्ये असलेने पुरामध्ये वाहून आलेली झाडेझुडुपे व ओंडके यांचे आघातामुळे दगडी पिलरचे दगड निखळले आहेत. यास्तव बंधाऱ्यामधून गळती होत असल्याने बंधाऱ्याची विशेष दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) बंधाऱ्याची दुरुस्ती आवश्यक असल्याने त्याबाबत विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील काबऱ्याखडक, लघुप्रकल्प धरणाचे डाव्या कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३५) ४५५०६ (२५-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील काबऱ्याखडक, लघुप्रकल्प धरणाचे डाव्या कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरत असूनही कालव्याचे काम पूर्ण होत नसल्यामुळे लाभक्षेत्र धारकांना पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय. धरण दरवर्षी पुर्ण क्षमतेने भरते, मुख्य कालवा कि.मी. १ ते ९ चे काम पूर्ण झाले आहे. वितरीका करण्यास शेतक-यास विरोध आहे. तथापि शेतकरी उपसाव्दारे सिंचनाचा लाभ घेत आहेत.

(३) कालवा व वितरीकांच्या कामासाठी आवश्यक असणा-या जमिन संपादनाने काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील विविध भागात सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ४५५१९ (२१-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यासह विविध भागात सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी (सुप्रमा) ४ वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे ३० हजार १५५ हेक्टर जमिन सिंचनासाठी तहानलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांच्या कामास अद्याप सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याने प्रकल्पांच्या किंमतीत वाढ होत आहे व शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनावर कोटयवधी रुपयांचा भार पडत असल्याने याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) बांधकामाधीन प्रकल्पांची कामे सु.प्र.मा. अभावी प्रलंबित राहू नये म्हणून उपरोक्त प्रकल्पांवर उपलब्ध निधीनुसार वेळोवेळी प्र.मा. पेक्षा जास्त खर्चास सक्षम स्तरावरुन परवानग्या देण्यात आलेल्या आहेत.

तसेच प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता गतीने देण्याकरिता जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५) जसं(आ), दि ९ सप्टेंबर, २०१५ अन्वये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जायकवाडी धरणातील मृत पाणीसाठा जिवंत करण्यासाठी खर्च करण्यात आलेले करोडो रुपये वाया गेल्याबाबत**

**(३७) ४५९९० (०४-०५-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणातील मृत पाणी साठा जिवंत करण्यासाठी शासनाने करोडो रुपये खर्च केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोडो रुपये खर्च करुनही सध्याच्या दुष्काळजन्य परीस्थितीत सदर मृत पाणी साठयाचा वापर करता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रकल्पातील मृत पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याचे आर्थिक स्त्रोत असलेले वस्तु व सेवाकर वसुलीबाबत नियोजन करण्याबाबत**

**(३८) ४६८१३ (१३-०५-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकांचा महत्वाचा आर्थिक स्त्रोत असलेला स्थानिक संस्था कर एलबीटी रद्द केल्यामुळे द्याव्या लागणाऱ्या भरपाईचा भार राज्याच्या तिजोरीवर आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचे आर्थिक स्त्रोत असलेले वस्तु व सेवाकर वसुलीबाबत नियोजन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१६) :**(१) होय.

(२) वस्तु व सेवा कर प्रणाली संशोधन बिल पारित झाल्यानंतर अंमलात येईल व सद्य:स्थितीत त्याच्या नियोजनावर भाष्य करता येत नाही.

(३) लागू नाही.

---

**पालघर (जि.पालघर) तालुक्यातील विलंगी, आगरवाडी व माकुणसार येथील खाजण जमिनीवर पुरंदरे खारभूमी योजना लागू केल्याबाबत**

**(३९) ४७०४७ (०६-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) तालुक्यातील येथील विलंगी, आगरवाडी व माकुणसार या गावाच्या दृष्टीने खाजण जमिनीवर शासनाने पुरंदरे खारभूमी योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वन विभागांच्या तिवरांची कांदळवन करण्याच्या योजनेमुळे विलंगी, आगरवाडी, माकुणसार, तिघरे, नगावे गावांतील शेत जमिनी व बागायत शेतीत भरतीचे खारे पाणी शिरून जमीन नापीक होणार असल्याने शेतकऱ्यांनी या योजनेला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शेतकऱ्यांचा या योजनेला विरोध असल्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बिरवाडी जलसिंचन योजना अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४०) ४७८३१ (३०-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बिरवाडी जलसिंचन योजनेस सन २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळून व आतापर्यंत सुमारे २७ कोटी ८३ लाख दहा हजार रुपयाचा निधी मिळून सदर योजनेचे काम अद्याप पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, तद्नुसार सदर जलसिंचन योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

या उपसा योजनेस नोव्हेंबर २००५ मध्ये रु.८.२७ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता व रु.१९.५६ कोटी रक्कमेस जुन २०१४ मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. आतापर्यंत या योजनेवर रु.१५.४४ कोटी खर्च झालेला असून सध्या सदर योजना बांधकामाधीन असून पूर्ण झालेली नाही.

(२) व (३) सदर योजनेची जलसंपदा विभागांतर्गत मुख्य अभियंता तसेच संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी पाहणी करण्यात येते योजनेचे उर्वरित काम २०१६-२०१७ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हातून गेलेल्या जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४१) ४७९९६ (३०-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील जायकवाडी धरणाचा डावा कालवा परभणी जिल्ह्यातून गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर कालव्याच्या दुरुस्ताव लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अभियंत्याकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.

(२) कालवा देखभाल दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार नियमीतपणे करावी लागतात. निधी उपलब्धतेप्रमाणे देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील निर्माणाधीन प्रकल्पांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४२) ४८०४८ (३०-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील निर्माणाधीन-३३ प्रकल्पांकरिता आवश्यक जमीन संपादनाकरिता ६३३ कोटी १६ लाख रुपयांची गरज असल्याने तसा प्रस्ताव शासनाकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील निर्माणाधीन प्रकल्पांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र. ४४९ दि. १८/०९/२०१५ अन्वये संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रकल्प निहाय एकुण रु. ६८०.१२ कोटी निधी मागणी केली असल्याचे कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना कळविले आहे.

(२) माहे मार्च - २०१६ पर्यंत मंडळ कार्यालयाकडून रु. ६३५.८५ कोटीची भूसंपादन मागणी प्राप्त झालेली असुन त्यापैकी रु. ४४०.१५ कोटी इतका निधी संबंधीत विभागास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(३) उर्वरित निधी सन २०१६-१७ चे तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या निधीमधून पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

### मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्यासाठी वित्त विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत

**(४३) ४८१९९ (२८-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्यासाठी वित्त विभागाने दिनांक १० ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन व लोकप्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंपगत्वाबाबतचा विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे सदर निवेदन अभिप्रायासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे दिनांक ३०.११.२०१५ रोजी पाठविले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अभिप्राय अप्राप्त आहेत. त्या विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी जिल्हयातील जिंतूर, मानवत व परभणी तालुक्यात सिंचनासाठी लाभदायी ठरणाऱ्या दुधला प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४४) ४८४१२ (३०-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जिंतूर मानवत व परभणी तालुक्यातील लाभदायी ठरणाऱ्या दूधना प्रकल्पाचे काम तीन वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) तसेच सदर प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण व्हावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.

(२) निम्न दुधना प्रकल्प तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीत असून सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्धतेनुसार जून २०१७ पर्यन्त प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) केंद्र शासनाच्या पंतप्रधान कृषि सिंचन योजने अंतर्गत निम्न दुधना प्रकल्प अंतर्भूत असून, यासाठी राज्याच्या अर्थसंपकल्पात सन २०१६-१७ साठी रुपये ४५२.४३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात सिंचनासाठी परवानगी मिळालेल्या देहरजी प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४५) ४८८५६ (०३-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील सिंचनासाठी असलेल्या देहरजी प्रकल्पास परवानगीस मिळूनही प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास विलंब होत असल्याचे दिनांक ०७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता सन १९७९ मध्ये प्राप्त झाली होती. तथापि सदरची मान्यता ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवूनही आर्थिक तरतूद नसल्याने ती व्यपगत झाली. तदनंतर महामंडळाचा निर्णय दिनांक २१/१०/२००५ अन्वये प्रकल्पास पुन:प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) सदरचा प्रकल्प पूर्वी सिंचन प्रकल्प म्हणून प्रस्तावित होता. तथापि आता शासन निर्णय दिनांक ४/३/२०१४ नुसार हा प्रकल्प वसई विरार शहर महानगर पालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी विरार महापालिकेच्या आर्थिक स्त्रोतातून राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रकल्पाच्या बूडीत क्षेत्रातील वनक्षेत्र हस्तांतराची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील खाजगी जमीन ताब्यात घेण्याबाबतची भू-संपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे काम वसई विरार महानगरपालिकेकडून प्राप्त होणाऱ्या निधीनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील जायकवाडी पाटबंधारे विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) ४९२७६ (०४-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जायकवाडी पाटबंधारे विभागात चार वर्षापासून पद भरती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) परभणी येथील जायकवाडी पाटबंधारे विभागात केवळ ३७ टक्के अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) मागील चार वर्षात गट-अ, गट-ब गट-क व गट-ड संवर्गामधील एकूण ४२ पदे भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यात ग्रामपंचायतीत ई पंचायत योजनेत काम करणाऱ्या संगणक परिचालकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ४९३१४ (२९-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात ग्रामपंचायतीत महा ऑनलाईन कंपनीकडून राबविण्यात येत असलेल्या ई पंचायत योजनेत तुटपुंज्या मानधनावर काम करणा-या संगणक परिचालकांचे मागील तीन महिन्यांपासून मानधन प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून संगणक परिचालकांना प्रलंबित मानधन तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) ई-पंचायत प्रकल्पांतर्गत नेमण्यात आलेल्या संगणक परिचालकांची नेमणूक महाऑनलाईन कंपनीकडून करण्यात आली होती. शासन निर्णयानुसार त्यांना मोबदला देण्याची वैधानिक जबाबदारी महाऑनलाईनची असल्याने सर्व संगणक परिचालकांना तात्काळ मोबदला अदा करण्याबाबत महाऑनलाईनला निर्देशित केले होते.

(३) महाऑनलाईनकडून जिल्हापरिषदेला देयके विलंबाने सादर करण्यात आली तसेच देयकांचे अंतीम स्वरुपात प्रदान असल्याने महाऑनलाईन व जिल्हा परिषदांचा ताळमेळा अंती देयक अदा करण्यात आले आहे.

---

**अहमदनगर जिल्हा पाणी बचाव समितीच्या वतीने समन्याची पाणी वाटप कायद्यामधील लाभ क्षेत्रासाठी असलेल्या तरतुदींत शासनाने दुरूस्ती करण्याबाबत**

**(४८) ४९७४८ (२५-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा पाणी बचाव समितीच्या वतीने सन २००५ च्या समन्याची पाणी वाटप कायद्यामधील लाभ क्षेत्रासाठी अन्यायकारक ठरलेल्या तरतुदींत शासनाने दुरूस्ती करावी, जल आराखड्याची जनसुनावणी अहमदनगर जिल्ह्यात घ्यावी, नैसर्गिक कारणाने अथवा शासनाच्या पाणी सोडण्याच्या धोरणांमुळे जमिनी नापीक राहिल्यास हेक्टरी ५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचा कायदा करावा, शासनाच्या शेतजमिनीवर १०० टक्के अनुदान ठिबक संच बसवावेत इत्यादी प्रमुख मागण्यासाठी श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान, भोकर व कारेगाव येथील कामगार तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत सह सेवा संस्था व इरिगेशन शाखा या शासकीय

कार्यालयावर जाऊन आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.
नगर जिल्हा पाणी बचाव समितीच्या वतीने विविध मागण्याबाबत जिल्हादंडाधिकारी कार्यालय,अहमदनगर व तहसिलदार राहाता, कोपरगाव, संगमनेर तालुक्यांचे निवेदन शासनास प्राप्त झालेली आहेत.
(२) उपरोक्त महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार समन्यायी पाणी वाटप धोरणामध्ये दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे गोदावरी खोऱ्याचा जल आराखडा अंतिम करण्याच्या दृष्टीने दि. १२/४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर तज्ञ समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यात बेझे गावच्या परिसरात किकवी धरण प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(४९) ५१२३३ (३०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यात बेझे गावच्या परिसरात किकवी धरण उभारण्यासाठी शासनाने मंजूरी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किकवी धरणाच्या कामाची निविदा प्रक्रिया होवून सुध्दा अद्‌याप कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहराचा झपाट्याने होत असलेला विकास व औद्‌योगिकरण लक्षात घेता शहरातील पाण्याची सद्‌य:स्थिती व भविष्यात भीषण होवू घातलेला पाणी प्रश्न या धरणामुळे सुटू शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) किकवी प्रकल्प हा नाशिक शहरासाठी पेयजल प्रकल्प म्हणून मंजूर केलेला आहे.
(४) प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत आवश्यक त्या परवानग्या मिळण्यासाठी खालिलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

१) वन जमीनीच्या प्रस्तावास मा. सचिव भारत सरकार पर्यावरण आणि वन विभाग, नवी दिल्ली यांचेकडून दि. २८.२.२०१४ रोजी तत्वत: मान्यता मिळाली आहे.
२) प्रकल्पाच्या पर्यावरण प्रस्तावास पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन , मंत्रालय, मुंबई यांचे इंग्रजी पत्र क्र. एसईएसी २०१३/ सीआर-३२१/टीसी-२ दि. २९.९.२०१४ अन्वये तत्वत: मान्यता मिळाली आहे.

तथापि शासन पत्र दि. ३०/०८/२०१३ व ०३/११/२०१४ व दि. १५/०९/२०१५ अन्वये अनुक्रमे वार्षिक योजना २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ च्या आखणीमध्ये पेयजल प्रकल्प अंतर्भुत करु नयेत असे निर्देश प्राप्त आहेत. किकवी प्रकल्प हा पेयजल प्रकल्प असल्यामुळे शासन निर्देशानुसार या प्रकल्पाचा अंतर्भाव सन २०१६-१७ या वर्षाच्या आखणी मध्ये करण्यासाठी आलेला नाही.

तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. १२४/२०१४ मध्ये सदर प्रकल्प असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीभूवन (ता.सुरगाणा, जि.नाशिक) येथील लघु-पाटबंधा-याच्या योजना सुरु करण्याबाबत**

**(५०) ५२५५७ (२९-०४-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीभूवन (ता.सुरगाणा, जि.नाशिक) येथील लघु-पाटबंधा-याच्या योजनेला शासनाने लपायो २००९/प्र.क्र.३९०/खारभूमी मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १८/०५/२०११, रुपये ९,००,७५,६९६/- किमंतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळून ५ वर्षे झाली आहेत या कालावधीत सदर योजनेची आजच्या स्थितीत अंदाज पत्रकीय किंमत किती झाली आहे,
(३) असल्यास, सदर योजनेचे काम अद्याप सुरु न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळून ५ वर्षे झाली असल्याने सन २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीत दरसूचीमध्ये झालेली वाढ तसेच व भूसंपादन व पुनर्वसन कायदा २०१३ मुळे भुसंपादन दरातील संभाव्य वाढ विचारात घेता, सद्य:स्थितीत प्रकल्प किंमत सुमारे रु. १९.८४ कोटी इतकी येत आहे.

(३) वनजमीन व खाजगी जमीन संपादन पूर्ण व्हायचे असल्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही.
(४) प्रकल्पासाठी आवश्यक वन व खाजगी जमीन संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. वन जमिन व खाजगी जमीनीचे संपादन पुर्ण झाले नंतर प्रकल्पाचे बांधकाम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.